जनप/बां.वि./जाहीर ई-निविदा/5141/2026
नगरपरिषद कार्यालय, जयसिंगपूर
दिनांक : 08/01/2026

जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर

■ जाहीर ई-निविदा सूचना 2026 बांधकाम विभाग ■

- मुख्याधिकारी, जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर, दूरध्वनी क्रमांक 02322-225624 हे नगरपरिषद बांधकाम विभागाकडील विकासकामांसाठी तांत्रिक विभागाशी संलग्न नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडून जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदरची ई-निविदा व सविस्तर माहिती तसेच ई-निविदेतील शुद्धीपत्रके, दुरुस्ती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 09/01/2026 रोजी सकाळी 11.00 वाजलेपासून ते दिनांक-16/01/2026 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत उपलब्ध होईल व निविदा सादर करणेची अंतिम मुदत दिनांक-16/01/2026, सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत असेल. सदर ई-निविदा उपरोक्त संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करता येईल.

सही/- मुख्याधिकारी, जयसिंगपूर नगरपरिषद | शिक्का | सही/- नगराध्यक्ष, जयसिंगपूर नगरपरिषद

ऊस गाळपात सोलापूर जिल्ह्याची आघाडी कायम

दोन कोटी टन ऊस गाळप अधिक : गाळपात दुसऱ्या क्रमांकावरील कोल्हापूरचा साखरउतारा सर्वाधिक १०.६५ : सोलापूर ८.३७ टक्के

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : मागील वर्षापेक्षा यंदा सुरू होणाऱ्या साखर कारखान्यांची संख्या कमी असली तरी तुलनेत या वर्षी दोन कोटी टन ऊस गाळप अधिक झाले आहे. एकूण गाळपात सोलापूर जिल्ह्याचा वाटा एक कोटी टनापेक्षा अधिक आहे.

राज्यात यंदा उशिरापर्यंत पाऊस पडत होता. त्यामुळे राज्याचा ऊस गाळप १ नोव्हेंबरपासून सुरू झाला. नोव्हेंबर महिन्यात पाऊस व पाण्यामुळे ऊसतोडणीसाठी व्यत्यय आला. परिणामत: साखर कारखाने सुरू होण्यासाठी उशीर झाला. असे असले तरी राज्यात सध्या १९६ साखर कारखाने सुरू आहेत. मागील वर्षी याच कालावधीत १९९ साखर कारखाने सुरू होते. म्हणजे मागील वर्षापेक्षा यंदा तीन साखर कारखाने कमी सुरू झाले आहेत. मागच्या वर्षापेक्षा यंदा तीन साखर कारखाने कमी सुरू झाले असले तरी ऊसगाळप मात्र यंदा दोन कोटी टनाने अधिक आहे. याचा अर्थ यंदा सुरू झालेले साखर कारखाने पूर्ण क्षमतेने सुरू असल्याचे दिसत आहे. नोव्हेंबर व डिसेंबर या दोन महिन्यात तब्बल राज्यात दोन कोटी टन ऊस गाळप अधिक झाल्याने गाळपाचा वेग वाढला आहे. यंदा आतापर्यंत झालेल्या ऊसगाळपात एकट्या सोलापूर जिल्ह्याचा वाटा एक कोटी टन आहे.

१ सोलापूर जिल्ह्यात ३३ साखर कारखान्यांचे १ कोटी ३ लाख टन ऊस गाळप झाले आहे. तसेच ३६ साखर कारखाने सुरू असले तर लोकशक्ती औराद, मातोश्री अक्कलकोट, गोकुळ शुगर धोत्री यांची ऊसगाळपाची नोंद झाली नाही. उर्वरित ३३ साखर कारखान्यांचे ऊस गाळप १ कोटी ३ लाख मेट्रिक टन इतके झाले आहे. साखरउतारा ८.३७ टक्क्यांपर्यंत पडला आहे.

२ कोल्हापूर जिल्ह्यात सोलापूरनंतर ८४ लाख टन ऊस गाळप झाले आहे. साखरउतारा मात्र राज्यात सर्वाधिक १०.६५ टक्के इतका आहे. गाळपात मागे (५२ लाख टन) असलेल्या सांगली जिल्ह्याचा साखरउतारा १०.१२ टक्के आहे.

३ ७३ लाख टन ऊसगाळप असलेल्या पुणे जिल्ह्याचा साखरउतारा ९ टक्क्यांपर्यंत, तर ७१ लाख टन गाळप झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्याचा साखरउतारा ८.२७ टक्के इतका आहे.

Office of the District Collector, Solapur and Returning Officer,
Vittalrao Shinde Sahakari Sakhar Karkhana Ltd., Gangamainagar, Pimpalner, Tal. Madha, Dist. Solapur.,

Board of Directors and Office Bearers Election-2026
(As per Multi-State Co-oprative Societies MSCS Act, 2002 as amended by MSCS (Amendment) Act, 2023 and read with MSCS Rules, 2002 as amended with MSCS (Amendment) Rules)

Notice of Election

Notice is hereby given that, as per CEA Order No. CEA-12011/414/2025 Dated 12th December 2025 Election is to be held for Board of Directors and Office Bearers of **"Vittalrao Shinde Sahakari Sakhar Karkhana Ltd.,"** Gangamainagar, Pimpalner, Tal. Madha, Dist. Solapur.,

- The number and type of "Board of Directors" to be elected : 21 (Ordinary Producer - 15, SC/ST- 01, Women - 02 Society - 01, Nomadic Tribe - 01 and OBC - 01)
- The number and type of "Office Bearers" to be elected : 02 (Chairperson - 01 and Vice- Chairperson- 01)
- Office address of Returning Officer (RO) : Office of the District Collector, Solapur, New Collector Office, Sat Rasta, Vijapur Road, Solapur-413003.
- Office address of Assistant Returning Officer (ARO) : Office of the Sub-Divisional Officer, Madha Division, Kurduwadi, Tal. Madha, Dist. Solapur.

Election Schedule

Election programme for "Board of Directors"

SL. No.	Particulars	Date	Time	Place
1	Publication of Provisional List of Members & Delegates, Eligible to Vote	27th January 2026 (Tuesday)	By Evening	Office of the RO/ARO, Karkhana Head office and all Branch Offices, Karkhana Website.
2	Time Window for Raising Objection to the Provisional List	28th January 2026 to 03rd February 2026 (Wednesday to Tuesday) 01 February Holiday	11:00 AM to 3:00 PM	ARO Office.
3	Scrutiny of objection received to the Provisional List (if any)	04th February 2026 to 07th February 2026 (Wednesday to Saturday)	11:00 AM to 3:00 PM	RO Office.
4	Publication of Final List of Members & Delegates, Eligible to Vote	07th February 2026 (Saturday)	By 5:00 PM	Office of the RO/ARO, Karkhana Head office and all Branch Offices, Karkhana Website.
5	Issue and Filing of Nomination Form	16th February 2026 to 18th February 2026 (Monday to Wednesday)	11:00 AM to 3:00 PM	ARO Office
6	Publication of List of Nominations Received	18th February 2026 (Wednesday)	By 5:00 PM	Office of the RO/ARO, Karkhana Head office and all Branch Offices, Karkhana Website.
7	Scrutiny of Received Nomination Forms	19th February 2026 (Thursday)	11:00 AM onwards	Place will be announced later.
8	Publication of List of Valid Nominations	19th February 2026 (Thursday)	Immediately after scrutiny	Office of the RO/ARO, Karkhana Head office and all Branch Offices, Karkhana Website.
9	Withdrawal of Nominations	20th February 2026 (Friday)	11:00 AM to 3:00 PM	ARO Office.
10	Publication of Final List of Contesting Candidates	20th February 2026 (Friday)	By 5:00 PM	Office of the RO/ARO, Karkhana Head office and all Branch Offices, Karkhana Website.
11	Date of Polling, if Necessary	27th February 2026 (Friday)	8:00 AM to 04:00 PM	Place of Polling will be Announced later.
		and all those who have entered polling station at 04 PM or before, should be allowed to cast vote		
12	Counting of votes	28th February 2026 (Saturday)	08:00 AM Onwards	Place of Counting will be Announced later.
13	Declaration of Result of "Board of Directors"	After approval of Cooperative Election Authority, New Delhi on Format 19M		

Election programme for "Office Bearer"

SL. No.	Particulars	Date	Time	Place
14	Announcement of Election Schedule	09th March, 2026 (Monday)	After Declaration of Result of Board of Directors Election	
	1. Time window for filing nomination		09:00 AM to 11:30 AM	ARO Office
	2. Scrutiny of nomination papers		12:30 PM to 02:00 PM	ARO Office
	3. Time and date for withdrawal		2:00 PM to 04:00 PM	ARO Office
	4. Display of list of the contesting candidate and schedule of election		By 04:00 PM	ARO Office
15	Meeting of Newly Constituted Board & Publication of List for Valid Nominations, Polling. (if required)	10th March, 2026 (Tuesday)	11:00 AM Onwards	Karkhana site Meating Hall
16	Declaration of Result of "Office Bearer"	After approval of Cooperative Election Authority, New Delhi on Format 19N		

1. MSCS Rules 19(I) and as per relevant clauses of Bye-laws of the **Vittalrao Shinde Sahakari Sakhar Karkhana Ltd.,** Members who have been registered in the final voter list will be eligible to vote for the said election.
2. Provisional List of members would be available for inspection at RO / ARO office and **Vittalrao Shinde Sahakari Sakhar Karkhana Ltd.'s** registered office, it's all branch Offices and karkhana website.
3. A copy of Voters list will be supplied to any member/delegate on payment of such fee as may be specified by the Board of Directors of the karkhana.
4. It is mandatory for the candidate, proposer and seconder to be a member of **Vittalrao Shinde Sahakari Sakhar Karkhana Ltd.** And his name must be included in the final voter list.
5. It is mandatory for the candidate or through any person authorized by him/her or his/her nominee, to file a Nomination form in the prescribed format 'Form III' For Board of Directors and 'Form V' for Office Bearer, to the Returning Officer OR Assistant Returning Officer, within the prescribed time limit.
6. The eligibility of the candidate to contest elections as a Board of Director and Office Bearer as per Sec 29, 43 and 44 of the Multi state Cooperative Societies Act and also as per Rules 19J, 19K and19L of MSCS Rules.
7. And as per the bye-laws of **Vittalrao Shinde Sahakari Sakhar Karkhana Ltd.,** a candidate should be eligible to contest elections as a Board of Director and Office Bearer.
8. Deposit for election shall be Rs.2000 /- and Scheduled Castes and Scheduled Tribes candidates Rs.500/- is Mandatory to attach the receipt of the said deposited amount along with the nomination paper.
9. The candidate filing Nomination form under the category of reserved seats for **SC/ST/NT/OBC** should attach copy of caste certificate duly attested by self, with his/her nomination form.
10. A candidate or his/her nominee or candidates representative (authorized in writing by the candidate) may give written notice of **withdrawal of his/her candidature** to the Returning Officer or Assistant Returning Officer within the prescribed time.
11. It will be necessary for all the Contesting Candidates to submit the details of their election expenses to the RO/ARO as the provisions of MSCS Rules 19(U), (V), (W), (X) and to adhere to the code of conduct.

Place : Solapur
Date : 08th January, 2026

(Kumar Ashirwad, IAS)
Returning Officer
Vittalrao Shinde Sahakari Sakhar Karkhana Ltd.,
And District Magistrate / Collector, Solapur.

महावितरण **जाहिर सूचना**

कार्या/बार्शी/मासं/10000613/2025/124068/153691 दि.29.10.2025
प्रति,
श्री. विशाल गंगाधर ओव्हाळ, तंत्रज्ञ, भ.नि.नि.क्र. 2553104, महावितरण, शा. का. मोडनिंब, उपविभाग टेंभुर्णी, रा येवता, ता. केज, जि बीड
विषय :- कारणे दाखवा सूचनापत्र (सेवाविनियम क्र. 34 (ख) प्रमाणे).

आपण, श्री विशाल गंगाधर ओव्हाळ, शाखा कार्यालय मोडनिंब, उपविभाग टेंभुर्णी येथे दिनांक 08.03.2022 पासून तंत्रज्ञ या पदावर कार्यरत असून कोणत्याही प्रकारच्या रजेचा अर्ज सादर न करता दिनांक 12.11.2024 ते 28.10.2025 पर्यंत एकूण 350 दिवस कामावरुन अनाधिकृतरित्या गैरहजर आहात.

गैरहजर कालावधीत आपणास हजर होणेकरिता वारंवार लेखी, व्हॉट्सअपव्दारे व भ्रमणध्वनीव्दारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु यातील कोणत्याच बाबीस आपण प्रतिसाद दिला नाही अथवा कामावर हजर होणेबाबत आपली इच्छा दर्शविली नाही. ज्यावरुन आपणास महावितरण कंपनीच्या सेवेमध्ये काम करण्याचे स्वारस्य नसलेचे दिसून येते.

सबब, म.रा.वि.वि.कंपनी मर्या. कर्मचारी सेवाविनियम 2005 मधील सेवाविनियम क्र 34 (ख) च्या तरतुदी अंतर्गत व 11 व्या अनुसूची तसेच अनुसूची "ग" व सुधारचिठ्ठी क्र. 42 दि. 04.05.2019 मध्ये प्रदान केलेल्या अधिकारांनुसार मी राकेश ज्ञानदेव मगर, कार्यकारी अभियंता तथा सक्षम अधिकारी, महावितरण, विभागीय कार्यालय, बार्शी या नात्याने **आपणास महावितरण कंपनीच्या सेवेतून का काढून टाकण्यात येऊ नये? याची कारणे सदरचे कारणे दाखवा सूचनापत्र वृत्तपत्रामध्ये जाहीर सुचना प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून 07 (सात) दिवसाचे आत या कार्यालयास सादर करणेबाबत आदेशित करत आहे. विहीत मुदतीत कारणे सादर न केल्यास आपणास काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन आपणास कंपनीच्या सेवेतून काढून टाकण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

(राकेश ज्ञानेदव मगर)
कार्यकारी अभियंता, महावितरण, बार्शी विभाग
PRO/BMTZ/171/2025-26

विक्रीसाठी ६१९ ट्रक कांदा; आवक वाढल्यानं भाव घसरला

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : मागील काही दिवसांपासून येथील श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याची आवक वाढत आहे. आवक वाढत असल्यानं दरात घसरण झाल्याचे पाहावयास मिळत आहे. राज्यातील इतर बाजार समितीपेक्षा जास्तीचा भाव मिळत असल्याने सोलापूर बाजार समितीत कांद्याची आवक वाढत असल्याचे बाजार समिती प्रशासनाने सांगितले.

दर २३०० रुपयांवर

१ दरम्यान, कमाल २५०० रुपयांच्या आसपास पोहोचलेला कांदा गुरुवारी २३०० रुपयांवर आला आहे.

२ सर्वसाधारण १००० रुपये दर असलेला कांदा ९०० रुपयांवर आला आहे. गुरुवारी ६१९ ट्रक कांद्याची आवक झाली होती. किमान दर १००, कमाल २३०० तर सर्वसाधारण ९०० एवढा मिळाला. गुरुवारी एकूण १ लाख २३ हजार ९१४ पिशव्यांतून ६१ हजार ९५७ क्विंटल कांदा बाजारात विक्रीसाठी आला आहे.

३ गुरुवारी ५ कोटी ५७ लाख ६१ हजार ३०० रुपयांची उलाढाल कांद्यातून झाल्याचे बाजार समिती प्रशासनाने सांगितले. सध्या बाजार समितीमध्ये दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मंगळवेढा, धाराशिव, लातूर, कर्नाटक राज्यातील विजयपूर, इंडी या भागातून कांदा विक्रीसाठी येत आहे. चांगला भाव मिळत असल्याने सोलापूर बाजार समितीमध्ये कांद्याची आवक वाढली आहे. [illegible] समितीत दुपारपर्यंत वाहनांची गर्दी होत आहे.

जी.डी.सी. अँड ए. व सी.एच.एम. परीक्षा २०२६ ची अधिसूचना

शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी. अँड ए.) परीक्षा व सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम.) परीक्षा दिनांक २६, २७ व २८ मे, २०२६ रोजी घेण्यात येणार आहे.

जी.डी.सी. अँड ए. बोर्डाच्या https://gdca.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरच स्वतःचा User ID व Password तयार करून या परीक्षेसाठी दिनांक ०९/०१/२०२६ ते दिनांक २३/०२/२०२६ या कालावधीत आणि फक्त ऑनलाइन पद्धतीनेच अर्ज करता येईल.

परीक्षेसाठी लागणारी आवश्यक अर्हता, अनुभव, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन अर्जासाठी तपशील परीक्षा केंद्र, शुल्क, परीक्षेच्या अटी व नियम, सूट, अभ्यासक्रम व इतर तपशिलासाठी सविस्तर अधिसूचना https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर "महत्त्वाचे दुवे" मधील "जी.डी.सी. अँड ए. मंडळ" येथे उपलब्ध आहे.

दिनांक :- ०७ जानेवारी, २०२६
(DGIPR-2025-26/क्र.5/C-9082)

स्वा/-
सचिव, जी.डी.सी. अँड ए. बोर्ड

Health Department, Zilla Parishad Solapur

Tender For Procurement of
Supply of Essential Instrucments
and Equipment
FOR THE YEAR 2025-26

Sr. No.	Details	Estimated tender amount in Lakh	Tender Form Fee in INR	Earnest Money Deposit in INR	Eligibility
01	Supply of Essential Instruments and Equipment	496.88	59,000/-	5,00,000/-	Manufacturer/ Distributor

Signed/-
District Health Officer
Zilla Parishad Solapur

Signed/-
Chief Executive Officer
Zilla Parishad Solapur

Health Department, Zilla Parishad Solapur

Tender For Procurement of
Supply & installation with commissioning of
Hospital Furniture
FOR THE YEAR 2025-26

Sr. No.	Details	Estimated tender amount in Lakh	Tender Form Fee in INR	Earnest Money Deposit in INR	Eligibility
01	Supply & Installation with commissioning of Hospital Furniture	494.22	59,000/-	5,00,000/-	Manufacturer/ Distributor

Signed/-
District Health Officer
Zilla Parishad Solapur

Signed/-
Chief Executive Officer
Zilla Parishad Solapur

भावसार व्हिजनच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी उपरे; सचिव पुकाळे

शिवाजी उपरे | गिरीश पुकाळे

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : बंगळुरू येथे नुकत्याच पार पडलेल्या भावसार व्हिजनच्या अधिवेशनात शिवाजी उपरे यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी, तर गिरीश पुकाळे यांची राष्ट्रीय सचिवपदी निवड करण्यात आली. राष्ट्रीय निवड समितीने दोघांच्या कार्याची दखल घेत ही निवड एकमताने केली.

शिवाजी उपरे हे संस्थेचे संस्थापक सदस्य आहेत. २०१५ मध्ये क्लबचे अध्यक्ष असताना त्यांनी सोलापूरला 'राष्ट्रीय सर्वोत्कृष्ट क्लब'चा बहुमान मिळवून दिला होता. उपरे हे विमा क्षेत्रात कार्यरत असून सोलापूर फिल्म सोसायटी, नाट्य परिषद आणि साहित्य परिषदेशी सक्रियपणे जोडलेले आहेत. गिरीश पुकाळे हे २००९ पासून संस्थेत कार्यरत असून, २०१९ मध्ये त्यांना राष्ट्रीय पातळीवरील 'सर्वोत्कृष्ट अध्यक्ष' पुरस्काराने गौरवण्यात आले होते. ते ऑटोमोबाईल इंजिनिअर असून सोलापूर महानगरपालिकेत वाहन विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. या निवडीबद्दल भावसार समाजातून व विविध क्षेत्रांतून त्यांचे कौतुक होत आहे.

अतिक्रमणामुळे भाजी मंडईत वाहतूक कोंडी

सोलापूर : मध्यवर्ती भागात असलेल्या भाजी मंडईमध्ये विक्रेत्यांनी थेट रस्त्यावर आपली दुकाने थाटल्याने रस्ते अरुंद झाले आहेत. यामुळे खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची आणि वाहनांची मोठी गर्दी होऊन वाहतूक कोंडीची समस्या दररोज उद्भवत आहे.